जा.क्र./मनपा/आस्था-१/२०२४/२२४
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक :- ३१/०१/२०२४.

**कार्यालयीन परिपत्रक :-**

असे निदर्शनास आले आहे की,महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचे मुदत विमा काढण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. सध्याच्या जीवनशैलीचा विचार करता, प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांचेकडे विमा कवच असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सर्व नियमित अधिकारी व कर्मचारी यांचा किमान रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रु.पन्नास लक्ष) रकमेचा मुदत विमा (Term Insurance) सुरु करण्याचे प्रशासनाच्या विचाराधीन आहे. हा मुदत विमा बँकेच्या माध्यमातून काढण्यात येणार असून विम्याचे प्रिमियमच्या रकमेपैकी काही रक्कम बँकेमार्फत अदा केली जाणार असून उर्वरीत रक्कम अधिकारी कर्मचारी यांचे मासिक वेतनातून हफ्त्याद्वारे कपात करण्यात येईल.

करीता या परिपत्रकान्वये, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील सर्व नियमित सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून मुदत विमा सुरु करण्याबाबत हरकती/सूचना मागविण्यात येत आहेत. याबाबत अधिकारी/कर्मचारी यांच्या काही हरकती किंवा सूचना असतील तर त्या दिनांक १५/०२/२०२४ पर्यंत उप आयुक्त-३ यांचेकडे सादर कराव्यात. विहित मुदतीत हरकती/सूचना प्राप्त न झाल्यास उपरोक्तप्रमाणे मुदत विमा (Term Insurance) सुरु करण्यास सर्वांची सहमती आहे असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रति,

सर्व विभाग प्रमुख/शाखा प्रमुख, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी सदरचे परिपत्रक त्यांचे अधिनस्त सर्व नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून द्यावे.